MHRT030011412020

| | | |
|---|---|---|
| दाखल तारीख | -- | ०२/०९/२०२० |
| नोंदणी तारीख | -- | ०७/०९/२०२० |
| निकाल तारीख | -- | १३/०६/२०२६ |
| कालावधी | -- | वर्षे महिने दिवस |
| | | ०५ ०९ ११ |

**रत्नागिरी येथील मुख्य न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालयात**

(पीठासीन अधिकारी श्रीम. एस.एस.पिंगळे यांचेसमोर)

**न्यायनिर्णय दिनांकः – १३/०६/२०२६**

**नियमित फौजदारी खटला क्रमांक १७७/२०२०**
**निशाणी २८**
जयगड पोलीस ठाणे गु.र.क्र.१३/२०२०

| | |
|---|---|
| **फियादी/सरकार पक्ष** | **महाराष्ट्र सरकार** तर्फे पोलीस ठाणे अधिकारी, जयगड पोलीस ठाणे, ता. जि. रत्नागिरी. |
| **सरकार पक्षातर्फे** | सहा. सरकारी अभियोक्ता श्री.पी.ए.सावंत. |
| **आरोपी** | १. **प्रसाद पंढरीनाथ बोरकर,** वय सुमारे ५० वर्षे, व्यवसाय – शेती,<br>२. **सुनाथ पंढरीनाथ बोरकर,** वय सुमारे ४८ वर्षे, व्यवसाय – रिक्षा चालक, दोघे राहणार वरवडे, भंडारवाडी, ता. जि. रत्नागिरी. |
| **आरोपी क्र. १ व २ तर्फे वकील** | श्री.ए.एल.चवंडे |

| | |
|---|---|
| गुन्हा तारीख | ११/०५/२०२० |
| पहिली खबर तारीख | ११/०५/२०२० |
| दोषारोपपत्र दाखल तारीख | ०३/०९/२०२० |
| दोषारोप निश्चीतीची तारीख | २३/०३/२०२१ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | १०/०१/२०२३ |
| न्यायनिर्णय राखीव ठेवल्याची तारीख | -- |
| न्यायनिर्णयाची तारीख | १३/०६/२०२६ |
| शिक्षेची तारीख, लागू असल्यास | -- |

| आरोपी क्रमांक | आरोपीचे नाव | अटकेची तारीख | जामिनावर खुले केल्याची तारीख | दोषारोप ठेवलेले गुन्हे | निर्दोष मुक्त केले की शिक्षा | दिलेली शिक्षा | फौ. प्र. सं. कलम ४२८ करीता संपरिक्षे दरम्यान निरुद्ध केलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | प्रसाद पंढरीनाथ बोरकर | १२/०५/२०२० | १२/०५/२०२० | भा.दं.वि.क. ३२६, ३२४, ३४१, ५०४, ५०६, सह ३४ | निर्दोष मुक्त | -- | -- |
| २. | सुनाथ पंढरीनाथ बोरकर | १२/०५/२०२० | १२/०५/२०२० | भा.दं.वि.क. ३२६, ३२४, ३४१, ५०४, ५०६, सह ३४ | निर्दोष मुक्त | -- | -- |

## अभियोग पक्षातर्फे साक्षीदारांची यादी

| सा. क्र. | साक्षीदाराचे नाव | निशाणी क्रमांक | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|---|
| १. | अंकुश रामचंद्र गुरव | १२ | फिर्यादी |
| २. | रविंद्र काशीनाथ खेडेकर | १३ | घटनास्थळ पंच |
| ३. | गजानन धोंडू हेदवकर | १५ | जप्ती पंच |
| ४. | श्रीराम अंकुश गुरव | १६ | साक्षीदार |
| ५. | वैभव विजय निमरे | १७ | साक्षीदार |
| ६. | किरण किशोर जाधव | १८ | साक्षीदार |
| ७. | विनायक बळवंत नांदीवडेकर | २० | साक्षीदार |
| ८. | डॉ. प्रमोद तुळशीराम सुर्यवंशी | २२ | वैद्यकीय अधिकारी |
| ९. | श्रीम. अस्मीता मारुती पाटील | २३ | तपास अधिकारी |

## बचाव पक्षातर्फे साक्षीदारांची यादी

| सा. क्र. | साक्षीदाराचे नाव | निशाणी क्रमांक | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|---|
| — | — | — | -- |

## न्यायालयीन साक्षीदारांची यादी

| सा. क्र. | साक्षीदाराचे नाव | निशाणी क्रमांक | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|---|
| -- | -- | -- | -- |

## अभियोग पक्षातर्फे दाखल कागदपत्र

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्रांचे वर्णन |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| १. | पी–१/स.सा.क्र.१ | लेखी फिर्याद |
| २. | पी–८/स.सा.क्र.२ | घटनास्थळ पंचनामा |
| ३. | पी–९/स.सा.क्र.३ | जप्ती पंचनामा |
| ४. | पी–१० व ११/ स.सा.क्र.३ | फोटो |
| ५. | पी–१२/स.सा.क्र.८ | विनायक नांदीवडेकर यांचे वैद्यकीय प्रमाणपत्र |
| ६. | पी–१३/स.सा.क्र.९ | तपासकामाचा आदेश |
| ७. | पी–१४/स.सा.क्र.९ | मुद्देमाल पावती |
| ८. | पी–१५/स.सा.क्र.९ | गटविकास अधिकारी, पंचायत समिती, रत्नागिरी यांना मुकबधीर जखमीचा तज्ञ शिक्षकामार्फत जबाब नोंदवून मिळणेबाबत दिलेले पत्र |
| ९. | पी–१६/स.सा.क्र.९ | मुख्याध्यापक, कै.केशव प.अभ्यंकर मुकबधीर विद्यालय, रत्नागिरी यांना मुकबधीर जखमीचा तज्ञ शिक्षकामार्फत जबाब नोंदवून मिळणेबाबत गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, रत्नागिरी यांनी दिलेले पत्र |
| १०. | पी–१७/स.सा.क्र.९ | मुख्याध्यापक, कै.के.प. अभ्यंकर मुकबधीर विद्यालय, रत्नागिरी यांना मुकबधीर जखमीचा तज्ञ शिक्षकामार्फत जबाब नोंदवून मिळणेबाबत तपास अधिकारी यांनी दिलेले पत्र |
| ११. | पी–१८/स.सा.क्र.९ | मुख्याध्यापक, कै.के.प. अभ्यंकर मुकबधीर विद्यालय, रत्नागिरी यांना विनायक नांदीवडेकर |

| | | |
|---|---|---|
| | | याचा शाळेचा दाखला मिळणेबाबत तपास अधिकारी यांनी दिलेले पत्र |
| १२. | पी–१९/स.सा.क्र.९ | विनायक नांदीवडेकर याचे बोनाफाईड |
| १३. | पी–२०/स.सा.क्र.९ | जखमींची वैद्यकीय कागदपत्रे व वैद्यकीय प्रमाणपत्र मिळणेबाबत डॉ. मिलींद पटवर्धन साफल्य हॉस्पीटल, रत्नागिरी यांना दिलेले पत्र |
| १४. | पी–२१/स.सा.क्र.९ | वैद्यकीय तपासणी होवून प्रमाणपत्र मिळणेबाबत वैद्यकीय अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्र, खंडाळा यांना दिलेले पत्र |

**बचाव पक्षातर्फे मान्य केलेली कागदपत्र**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्रांचे वर्णन |
|---|---|---|
| -- | -- | -- |

**बचाव पक्षातर्फे दाखल केलेली कागदपत्र**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्रांचे वर्णन |
|---|---|---|
| -- | -- | -- |

**न्यायालयीन कागदोपत्री निशाण्यांची यादी**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्रांचे वर्णन |
|---|---|---|
| -- | -- | -- |

**मुद्देमाल**

| अ.क्र. | मुद्देमाल वस्तू क्रमांक | वर्णन |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| १. | -- | काळ्या पिवळ्या रंगाची ऑटो रिक्षा क्र.एम.एच.०८/ई/५१२७ |
| २. | -- | हिरो होंडा कंपनीची स्प्लेंडर मोटर सायकल क्र.एम.एच.०८/टी/६६६५ |
| ३. | मुद्देमाल वस्तू क्र.१ | लाकडी दांडका |
| ४. | मुद्देमाल वस्तू क्र.२ | लाकडी दांडका |

............................................

## न्यायनिर्णय

(खुल्या न्यायालयात जाहीर)

१.　　आरोपींच्या विरुद्ध भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ३२६, ३२४, ३४१, ५०४, ५०६ सह ३४ अन्वये दोषारोपपत्र दाखल करण्यात आले होते.

२.　　अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत खालीलप्रमाणे –

यातील फिर्यादी–अंकुश रामचंद्र गुरव हा वरचे वरवडे, ता. जि. रत्नागिरी येथे त्याच्या कुटूंबासह रहातो. प्रत्येकी वर्षी तो आंबा बाग कराराने घेत असतो. सन २०१९ मध्ये वरवडे पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळ, वरवडे या शाळेची बाग त्यांनी एक वर्षाच्या कराराने रुपये ४५,०००/– देवून घेतली होती. त्या कराराप्रमाणे त्याने सदर शाळेच्या बागेतील आंबे काढलेले होते. दिनांक ३१/०७/२०१९ रोजी सदर शिक्षण संस्थेकडे ३ वर्षांच्या कराराने त्यांनी सदरची बाग रुपये १,५२,०००/– देवून घेतली होती. सदर बागेमध्ये फिर्यादी, त्याचा मुलगा व कामगार असे डिसेंबर २०१९ मध्ये आंबा कलमांवर फवारणी करुन परत येत असताना वाटेतच वरवडे, भंडारवाडा येथे आरोपी सुनाथ बोरकर हा भेटला व त्याने, ''या पुढे सदर बागेत जायचे नाही, ती बाग आमची आहे'', असे सांगितले. दिनांक ११/०५/२०२० रोजी सकाळी ०९.०० वाजण्याचे सुमारास फिर्यादी, त्याचा मुलगा श्रीराम, कामगार हे महिंद्रा

मॅक्झीमो गाडी नं.एम.एच.४६/ई/४४९० या गाडीतून सदर बागेमध्ये आंबे काढण्याकरीता गेले. त्यावेळी सदर शिक्षण संस्थेचा मुकबधीर शिपाई विनायक नांदीवडेकर हा सुद्धा सकाळपासून त्यांच्यासोबत होता. सायंकाळी ०५.१५ वाजण्याचे सुमारास ते आंबे काढून जात असताना आरोपी आले व विनायक नांदीवडेकर याला आरोपी प्रसाद बोरकर म्हणाला की, ''संस्थेने तुला पहाऱ्याकरीता ठेवले आहे का ? थांब तुला दाखवतो''. आरोपींनी लाकडी दांडक्याने त्याच्या हातावर, पायावर व पाठीवर मारण्यास सुरुवात केली. सदर भांडण सोडवण्यासाठी फिर्यादीला गेला असता त्यालाही आरोपीने डाव्या पायावर काठीने मारहाण केली. आरोपींनी त्यांना सर्वांना, ''आई झवाड्यांनो, तुम्हाला आंबे काढण्यासाठी कोणी पाठवले, परत आमच्या बागेत पाय टाकला तर मारुन टाकीन, तसेच, परत तुम्ही आमच्या बागेतील कोणीही आंबे काढून घेवून जायचे नाही, नाहीतर एका एकाला बघून घेतो'', अशी शिवीगाळ व धमकी दिली. त्यामुळे फिर्यादीने रत्नागिरी जयगड सागरी पोलीस ठाण्यात आरोपींचे विरुद्ध लेखी फिर्याद दाखल केली.

३. त्याअनुषंगाने, जयगड सागरी पोलीस ठाणे गुन्हा रजिस्टर क्र.१३/२०२० दाखल झाला. त्याचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक अस्मीता पाटील यांनी केला. तपासकामी त्यांनी घटनास्थळ पंचनामा केला, नकाशा काढला, घटनास्थळाचे फोटो काढले, जप्ती पंचनामा केला, मुद्देमाल पावती तयार केली, विनायक नांदीवडेकर या मुकबधीर जखमीचा तज्ञ शिक्षकामार्फत जबाब नोंदवून मिळणेबाबत, त्याचे शाळेचा दाखला मिळणेबाबत पत्रव्यवहार केला, साक्षीदारांची टिपणे नोंदवली व तपास पूर्ण झाल्यानंतर आरोपींचे विरुद्ध दोषारोपपत्र दाखल करण्यात आले.

४. माझे पूर्व पिठासीन अधिकाऱ्यांनी आरोपींच्या विरुद्ध निशाणी ०८ अन्वये, भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ३२६, ३२४, ३४१, ५०४, ५०६ सह ३४ अन्वये दंडनिय अपराध केल्याबाबत, दोषारोप विरचित केला. त्यामधील मजकूर आरोपींना वाचून

आणि समजावून सांगितला. आरोपींनी गुन्हा कबूल नसल्याचे सांगितले व संपरिक्षा घेण्याचे सुचविले. आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ अन्वयेचे निवेदन निशाणी क्र. २५ व २६ येथे नोंदवण्यात आले. त्यामध्ये आरोपींनी खोट्या खटल्यात गुंतवण्यात आल्याचा बचाव घेतला आहे.

५.        माझ्यासमोर आलेले प्रश्न आणि त्यावरील माझे निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत.

| | प्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दिनांक ११/०५/२०२० रोजी सकाळी ०९.०० वाजण्याचे सुमारास वरवडे पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळ, वरवडे या शाळेच्या बागेत, ता.जि.रत्नागिरी येथे आरोपींनी त्यांच्या समान उद्देशाच्या पुनर्सरनार्थ साक्षीदार विनायक नांदीवडेकर याला त्याच्या उजव्या हातावर, पाठीवर लाकडी दांडक्याने मारुन इच्छापुर्वक गंभीर दुखापत पोहोचवली व त्याद्वारे आरोपींनी भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ३२६ सह ३४ अन्वये गुन्हा केला, असे अभियोग पक्षाने सिद्ध केले आहे काय ? | नकारार्थी |
| २. | वर नमूद तारीख, वेळ व ठिकाणी, आरोपींनी त्यांच्या समान उद्देशाच्या पुनर्सरनार्थ फिर्यादीला त्याच्या उजव्या हातावर, पाठीवर आणि पायांवर लाकडी दांडक्याने की, जो गुन्ह्यात हत्यार म्हणुन वापरला तर मृत्यू येवू शकतो, त्याने मारुन इच्छापुर्वक दुखापत पोहोचवली व त्याद्वारे आरोपींनी भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ३२४ सह ३४ अन्वये गुन्हा केला, असे अभियोग पक्षाने सिद्ध केले आहे काय ? | नकारार्थी |

| | | |
|---|---|---|
| ३. | वर नमूद तारीख, वेळ व ठिकाणी, आरोपींनी त्यांच्या समान उद्देशाच्या पुनर्सरनार्थ फिर्यादी व साक्षीदारांच्या महिंद्रा मॅक्झीमो गाडीच्या पुढे मोटर सायकल व ऑटो रिक्षा घालून त्यांना सदरची महिंद्रा मॅक्झीमो गाडी आरोपी क्र.१ च्या वरवडे येथील घरी नेण्यास भाग पाडले व त्याद्वारे आरोपींनी भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ३४१ सह ३४ अन्वये गुन्हा केला, असे अभियोग पक्षाने सिद्ध केले आहे काय ? | नकारार्थी |
| ४. | वर नमूद तारीख, वेळ व ठिकाणी, आरोपींनी त्यांच्या समान उद्देशाच्या पुनर्सरनार्थ फिर्यादीला व साक्षीदारांच्या हातून सार्वजनिक शांतता भंग व्हावी किंवा अन्य कोणतातरी अपराध घडावा या उद्देशाने शिवीगाळ करुन त्यांचा इच्छापुर्वक अपमान केला व आरोपींनी भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ५०४ सह ३४ अन्वये गुन्हा केला असे अभियोग पक्षाने सिद्ध केले आहे काय ? | नकारार्थी |
| ५. | वर नमूद तारीख, वेळ व ठिकाणी, आरोपींनी त्यांच्या समान उद्देशाच्या पुनर्सरनार्थ फिर्यादी व साक्षीदारांना मारुन टाकण्याची धमकी दिली व आरोपीने भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ५०६ सह ३४ अन्वये गुन्हा केला असे अभियोग पक्षाने सिद्ध केले आहे काय ? | नकारार्थी |
| ६. | आदेश काय ? | आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात येते. |

# कारणमीमांसा

**प्रश्न क्रमांक १ ते ५ बाबत : –**

६. फिर्यादी–अंकुश गुरवने आरोपींनी त्यास व विनायक नांदीवडेकर यास लाकडी दांडक्याने मारहाण केली तसेच आंब्यांनी भरलेली गाडी आरोपींच्या घरी नेऊन आंबे उतरवून घेतल्याचा आरोप केला आहे. तथापि त्याच्या उलटतपासात आलेल्या बाबींचा विचार करता त्याची साक्ष पूर्णतः विश्वासार्ह वाटत नाही. प्रथमदर्शनी, साक्षीदाराने मान्य केले आहे की, सन २०१९ मध्ये याच आंबा बागेबाबत आरोपींनी त्याला आंबे काढू नयेत अशी समज दिली होती. त्यावेळी आरोपींनी संबंधित कलम बाग शिक्षण संस्थेची नसल्याचे सांगितले होते. तसेच आरोपींनी त्याच्याविरुद्ध आंबे चोरून नेल्याची ऑनलाईन तक्रार जयगड पोलीस ठाण्यात दिलेली होती, ही बाबही त्याने मान्य केली आहे. पुढे त्याने २०१९ साली संस्थेला आपण आंबे काढणार नसल्याचे पत्र दिले होते, असेही कबूल केले आहे. याहून महत्त्वाची बाब म्हणजे, सन २०२० मध्ये सदर बागेतील आंबे काढण्यासाठी कोणताही लेखी करार केलेला नव्हता, हेही त्याने स्पष्टपणे मान्य केले आहे. त्यामुळे घटनेच्या दिवशी तो संबंधित बागेत कोणत्या वैध अधिकाराने आंबे काढत होता, याबाबत गंभीर शंका निर्माण होते.

७. साक्षीदाराने पुढे मान्य केले आहे की, २०१९ मध्ये ज्याबाबत आरोपींनी त्याच्या विरोधात तक्रार केली होती त्याच बागेत तो २०२० मध्ये पुन्हा आंबे काढण्यासाठी गेला होता. या स्वीकारोक्तीमुळे आरोपी आणि फिर्यादी यांच्यात पूर्वीपासूनच सदर आंबा बागेच्या मालकी व ताब्याबाबत वाद असल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे फिर्यादी हा पूर्णपणे निष्पक्ष साक्षीदार रहात नाही. फिर्यादीने सरतपासात सदर बाग शिक्षण संस्थेच्या कराराने घेतल्याचे सांगितले असले तरी उलटतपासात, त्याने शिक्षण मंडळाच्या नावावरील सातबारा पाहिलेला नसल्याचे मान्य केले आहे. एवढेच नव्हे तर, "कलम बाग ही शिक्षण संस्थेच्या मालकीची होती अगर कसे याविषयी मी वैयक्तिकरित्या ठोसपणे सांगू शकत नाही" अशी स्पष्ट कबुली दिली आहे. ही कबुली अत्यंत महत्त्वाची आहे. कारण फिर्यादीचा संपूर्ण दावा हा शिक्षण संस्थेकडून बाग

कराराने घेतल्यावर आधारित आहे. परंतु त्यालाच बागेची मालकी निश्चितपणे सांगता येत नाही. त्यामुळे त्याचा दावा स्वतःच संशयास्पद ठरतो.

८. फिर्यादीच्या म्हणण्यानुसार, त्याच्या डाव्या पायावर दांडक्याने मारहाण झाली होती. मात्र त्याने केवळ पायाला सूज आल्याचे सांगितले आहे. गंभीर मारहाण झाल्याचा दावा असूनही त्या जखमेचे ठोस वैद्यकीय स्वरूप या साक्षीतून दिसून येत नाही. तसेच फिर्यादीने सांगितले की, त्याच्या मुलाने आरोपीच्या हातातील दांडा काढून घेतला होता. परंतु तोच दांडा पोलीसांनी त्याच्याकडून, मुलाकडून किंवा घटनास्थळावरून जप्त केल्याची त्याला माहिती नसल्याचे त्याने कबूल केले आहे. यावरून कथित हत्याराचा आरोपींशी असलेला संबंध सिद्ध होत नाही. फिर्यादीने न्यायालयात दाखवलेले दांडके ओळखले असले तरी उलटतपासात त्याला असे सुचविण्यात आले की, अशा प्रकारचे दांडके इतरत्र सहज उपलब्ध होऊ शकतात. दांडके आरोपींकडून किंवा घटनास्थळावरून जप्त झाल्याचा ठोस पुरावा नसल्याने केवळ न्यायालयातील ओळख हा दोषारोप सिद्ध करण्यासाठी पुरेसा पुरावा मानता येत नाही.

९. फिर्यादीच्या कथनानुसार, आरोपींनी त्यांना मारहाण करून त्यांच्या गाडीस पुढे व मागे स्वतःच्या गाड्या लावून सर्व आंबे त्यांच्या घरी नेण्यास भाग पाडले. मात्र या कथित घटनेदरम्यान फिर्यादीबरोबर त्याचा मुलगा आणि अनेक कामगार उपस्थित होते. एवढ्या लोकांच्या उपस्थितीत आरोपींनी दोन वाहनांच्या सहाय्याने संपूर्ण गाडी आपल्या घरी नेली, हा घटनाक्रम स्वाभाविक मानणे कठीण वाटते. विशेष म्हणजे, आरोपींच्या घरी पोहोचल्यानंतरही फिर्यादी किंवा त्याच्या सोबत्यांनी तत्काळ कोणत्याही पोलीस यंत्रणेला किंवा स्थानिक अधिकाऱ्यांना संपर्क केल्याचे दिसून येत नाही.

१०. फिर्यादीने मान्य केले आहे की, सायंकाळी सव्वा पाच वाजता तो घरी गेला आणि रात्री आठ वाजता पोलीस स्टेशनला गेला. या दरम्यान त्याने शिक्षण मंडळाच्या

पदाधिकाऱ्यांना घटनेची माहिती दिली व चर्चा केली होती. ही बाब महत्त्वाची आहे. कारण त्यामुळे फिर्याद तत्काळ व स्वयंस्फूर्त नसून विचारविनिमयानंतर दिली गेल्याची शक्यता निर्माण होते.

११.		उलटतपासात फिर्यादीने हेही मान्य केले आहे की, तो शिक्षण मंडळाच्या क्लार्कच्या वाहनातून न्यायालयात साक्षीसाठी आला होता व पंच साक्षीदार आणि नांदीवडेकर हे देखील त्याच्यासोबत आले होते. ही बाब दर्शविते की सरकारी साक्षीदारांमध्ये परस्पर संपर्क व समन्वय होता. त्यामुळे त्यांच्या साक्षीकडे आवश्यक त्या सावधगिरीने पाहणे गरजेचे आहे.

१२.		साक्षीदार क्र. २ रविंद्र खेडेकर हा साक्षीदार केवळ घटनास्थळ पंचनामा (Spot Panchanama) व हातनकाशा सिद्ध करण्यासाठी तपासण्यात आलेला पंच साक्षीदार आहे. त्याने घटनेचा प्रत्यक्ष प्रकार पाहिलेला नाही. त्यामुळे त्याच्या पुराव्याचे मूल्य मर्यादित आहे.

१३.		साक्षीदार क्र.२ हा घटनास्थळ पंचनाम्यावरील पंच साक्षीदार आहे. त्याने दिनांक १२/०५/२०२० रोजी पोलीसांनी घटनास्थळ पंचनामा व हातनकाशा त्याच्या उपस्थितीत तयार केल्याचे सांगितले आहे. त्याने पंचनाम्यावरील व हातनकाशावरील स्वाक्षरी मान्य केली आहे. मात्र या साक्षीदाराने कथित मारहाण अथवा आंबे नेण्याची घटना प्रत्यक्ष पाहिलेली नाही. त्यामुळे आरोपींनी गुन्हा केला किंवा नाही याविषयी त्याची साक्ष थेट पुरावा (Direct evidence) ठरत नाही. उलटतपासात या साक्षीदाराच्या साक्षीत काही महत्त्वाच्या बाबी समोर येतात. प्रथम, साक्षीदाराने घटनास्थळाच्या जागेच्या मालकीची कागदपत्रे आपण पाहिली होती व त्यांचा सर्व्हे नंबर व हिस्सा नंबर पंचनाम्यात नमूद असल्याचे सांगितले. मात्र पंचनामा दाखविल्यानंतर त्यात अशी कोणतीही नोंद नसल्याचे त्याला मान्य करावे लागले. यावरून साक्षीदाराला पंचनाम्यातील मजकुराबाबत स्पष्ट व अचूक माहिती नसल्याचे दिसून

येते. त्याच्या स्मरणशक्तीची व निरीक्षणाची विश्वासार्हता त्यामुळे कमी होते. दुसरे म्हणजे, साक्षीदाराने यापूर्वी कधीही पंच म्हणून काम केले नव्हते व केवळ पोलीसांनी बोलावल्यामुळे तो पंच म्हणून उभा राहिला होता, असे मान्य केले आहे. त्यामुळे त्याला पंचनाम्याच्या प्रक्रियेची विशेष माहिती असल्याचे दिसून येत नाही. तिसरे म्हणजे, उलटतपासात घटनास्थळ कोणत्या रस्त्यालगत आहे याबाबत त्याच्या उत्तरांमध्ये काही प्रमाणात संदिग्धता दिसून येते. सुरुवातीला त्याने काही सूचना नाकारल्या असल्या तरी पुढे खंडाळा व मालगुंड रस्त्यांबाबत स्पष्टीकरण दिले आहे. यावरून घटनास्थळाचे अचूक स्थान त्याला पूर्ण खात्रीने सांगता येत नसल्याचे दिसून येते.

१४. साक्षीदार क्र.२ हा केवळ औपचारिक स्वरूपाचा पंच साक्षीदार आहे. त्याने घटना प्रत्यक्ष पाहिलेली नाही. त्याच्या पुराव्यातून आरोपींचा सहभाग, कथित मारहाण किंवा धमकी यापैकी कोणतीही बाब सिद्ध होत नाही. उलट, घटनास्थळाच्या मालकीबाबत व पंचनाम्यातील मजकुराबाबत त्याच्या साक्षीत त्रुटी व अनिश्चितता आढळून येते. म्हणून साक्षीदार क्र.२ याचा पुरावा सरकार पक्षाच्या मुख्य आरोपांना कोणतेही भक्कम पुष्टीकरण देत नाही. हा पुरावा केवळ घटनास्थळ पंचनामा तयार झाल्याचे दर्शवितो; परंतु आरोपींविरुद्धचा गुन्हा संशयाच्या पलीकडे सिद्ध करण्यास तो अपुरा व निष्प्रभ ठरतो. त्यामुळे या साक्षीदाराच्या पुराव्यावरून आरोपींच्या दोषसिद्धीस कोणतीही विशेष मदत होत नाही.

१५. साक्षीदार क्र. ३ गजानन हेदवकर याने दिनांक १२/०५/२०२० रोजी आरोपींच्या घराजवळ पोलीसांनी एक रिक्षा, एक हिरो होंडा मोटारसायकल व दोन लाकडी दांडके जप्त केल्याचे सांगितले आहे. त्याने जप्ती पंचनाम्यावरील स्वाक्षरी मान्य केली असून न्यायालयात दाखविण्यात आलेले दांडके ओळखले आहेत. मात्र या साक्षीदाराची साक्ष तपासून पाहिल्यास ती आरोपींना गुन्ह्याशी जोडणारा ठोस पुरावा ठरत नाही. जप्त वस्तूंचा गुन्ह्याशी संबंध सिद्ध होत नाही. साक्षीदाराने स्पष्टपणे कबूल केले आहे की, "रिक्षामध्ये काठ्या कोणी

ठेवल्या व केव्हा ठेवल्या याची मला प्रत्यक्षात कोणतीही माहिती नाही." ही कबुली अत्यंत महत्त्वाची आहे.

१६.	सरकार पक्षाचा दावा असा आहे की, याच काठ्यांनी फिर्यादीस मारहाण करण्यात आली. परंतु पंच साक्षीदारालाच त्या काठ्या रिक्षात कशा आल्या, कोणी ठेवल्या, किती वेळापासून होत्या किंवा त्यांचा घटनेशी काही संबंध होता का, याबाबत कोणतीही माहिती नाही. त्यामुळे जप्त केलेल्या दांडक्यांचा कथित गुन्ह्याशी आवश्यक असा दुवा (link evidence) सिद्ध होत नाही. आरोपींच्या ताब्यातील मालमत्ता असल्याचे सिद्ध नाही. साक्षीदाराने कबूल केले आहे की, "मी ज्या घरी गेलो ते घर आरोपींच्या मालकीचे असल्याचे कागदपत्र मी पाहिलेले नव्हते." तसेच त्याला त्या घराचा क्रमांकही सांगता आलेला नाही. यावरून जप्ती ज्या ठिकाणाहून झाल्याचे सांगितले जाते ते ठिकाण प्रत्यक्षात आरोपींचेच होते, ही बाबही त्याच्या साक्षीतून सिद्ध होत नाही. पोलीसांचे नियमित पंच म्हणून वापरले जाण्याची शक्यता, साक्षीदाराने कबूल केले आहे की, "माझा मोबाईल नंबर पोलीसांकडे आहे. गरज पडल्यास पोलीस मला पंचनाम्यासाठी बोलावून घेतात."ही कबुली महत्त्वाची आहे. यावरून तो पोलीसांच्या संपर्कातील व्यक्ती असल्याचे दिसते. अशा परिस्थितीत त्याची स्वतंत्रता व निष्पक्षता याकडे सावधगिरीने पाहणे आवश्यक ठरते. जरी त्याने आपण नियमित पंच नसल्याचे सांगितले असले तरी पोलीसांना गरज पडल्यास ते त्यालाच पंचनाम्यासाठी बोलावतात, ही बाब नोंद घेण्यासारखी आहे. जप्तीपूर्वी घटनास्थळी उपस्थित साक्षीदाराने स्पष्टपणे मान्य केले आहे की, "मी घटनास्थळी जाण्याअगोदर तेथे पोलीस आलेले होते." या कबुलीमुळे जप्तीची संपूर्ण प्रक्रिया पंचाच्या उपस्थितीतच सुरू झाली होती का, याबाबत शंका निर्माण होते. जप्त वस्तूंची मूळ स्थिती काय होती, त्या कोठे होत्या, पोलीस घटनास्थळी पोहोचल्यावर काय घडले, याबाबत या साक्षीदाराला प्रत्यक्ष माहिती नाही.

१७.	सदर साक्षीदाराने स्वतः कबूल केले आहे की, "जप्त केलेल्या काठ्यांसारख्या

काठ्या गावामध्ये कोठेही मिळून येतात."या कबुलीमुळे दांडक्यांची विशेष ओळख अथवा वैशिष्ट्य नष्ट होते. जेव्हा दांडके सर्वसाधारण स्वरूपाचे असतात आणि त्यांच्यावर कोणतेही विशिष्ट चिन्ह, खूण किंवा वैज्ञानिक पुरावा उपलब्ध नसतो, तेव्हा केवळ अशा दांडक्यांची जप्ती आरोपींना गुन्ह्याशी जोडण्यासाठी पुरेशी ठरत नाही. साक्षीदाराने मारहाण प्रत्यक्ष पाहिलेली नाही. आंब्यांचा वाद पाहिलेला नाही. दांडके वापरताना आरोपींना पाहिलेले नाही. दांडके रिक्षात कोणी ठेवली हे माहीत नाही. जप्तीचे ठिकाण आरोपींचेच होते का हेही निश्चित सांगितलेले नाही. परिणामी, या साक्षीदाराच्या साक्षीवर आधारित आरोपींची दोषसिद्धी करणे सुरक्षित ठरणार नाही आणि त्याचा पुरावा दोषसिद्धीसाठी अपुरा ठरतो.

१८.　　साक्षीदार क्र.४ श्रीराम गुरव हा फिर्यादी अंकुश गुरव यांचा मुलगा असून तो स्वाभाविकपणे हितसंबंधी (interested witness) साक्षीदार आहे. त्याने सरतपासात फिर्यादीच्या कथनाला पुष्टी देण्याचा प्रयत्न केला आहे. तथापि त्याच्या उलटतपासात आलेल्या कबुलीजबाबांमुळे त्याच्या साक्षीची विश्वासार्हता कमी होते. साक्षीदाराने मान्य केले आहे की, डिसेंबर २०१९ मध्ये आरोपींनी संबंधित आंबा कलमे त्यांची असल्याचे सांगून त्यावर फवारणी करू नका, असे स्पष्टपणे सांगितले होते. यावरून घटनेपूर्वीपासूनच पक्षकारांमध्ये आंबा बागेच्या मालकी व ताब्याबाबत वाद अस्तित्वात होता, हे स्पष्ट होते. तसेच साक्षीदाराने कबूल केले आहे की, घटनेच्या दिवशी आरोपींनी आंबे चोरल्याची तक्रार त्यांच्या विरोधात पोलीसांकडे दिल्याचे त्यांना सांगण्यात आले होते. ही बाब आरोपींकडून आधीपासून मालकीचा दावा केला जात असल्याचे दर्शविते. साक्षीदाराला संबंधित बागेचा सर्व्हे नंबर, हिस्सा नंबर किंवा मालकीविषयी कोणतीही वैयक्तिक माहिती नाही. कथित करारपत्र त्याच्या समक्ष झालेले नव्हते व त्यातील तपशीलही त्याला माहीत नाहीत. त्यामुळे बागेवर फिर्यादी पक्षाचा कायदेशीर हक्क होता, हे त्याच्या साक्षीतून सिद्ध होत नाही. विशेष म्हणजे, साक्षीदाराच्या म्हणण्यानुसार आरोपींनी सर्व आंबे त्यांच्या घरी उतरवून घेतले. तथापि त्या आंब्यांच्या परतफेडीसाठी त्यांनी कोणताही अर्ज, दावा किंवा स्वतंत्र कारवाई केली नाही, हे त्याने कबूल केले आहे. इतक्या मोठ्या प्रमाणात

आंबे जबरदस्तीने नेण्यात आले असतील तर त्यांची परत मिळविण्यासाठी कोणतीही कारवाई न करणे ही बाब अस्वाभाविक वाटते. याशिवाय कथित आंब्यांचे पुढे काय झाले याचीही त्याला माहिती नसल्याचे त्याने सांगितले आहे. त्यामुळे साक्षीदार क्र.४ याची साक्ष ही प्रामुख्याने फिर्यादीच्या कथनाची पुनरावृत्ती स्वरूपाची असून स्वतंत्र व विश्वासार्ह पुष्टी देत नाही. उलटतपासात आलेल्या कबुलीजबाबांवरून, आंबा बागेच्या मालकीबाबत गंभीर वाद अस्तित्वात होता, तसेच साक्षीदाराला त्या बागेच्या मालकी किंवा करारासंबंधी आवश्यक माहिती नसल्याचे दिसून येते. त्यामुळे त्याचा पुरावा आरोपींचा गुन्हा संशयाच्या पलीकडे सिद्ध करण्यास पुरेसा ठरत नाही.

१९. साक्षीदार क्र.५ वैभव निमरे हा फिर्यादी अंकुश गुरव यांचा मुलगा श्रीराम गुरव याच्याकडे मजूर म्हणून काम करणारा साक्षीदार आहे. त्यामुळे तो पूर्णपणे स्वतंत्र साक्षीदार नसून फिर्यादी पक्षाशी संबंधित व आर्थिकदृष्ट्या त्यांच्यावर अवलंबून असलेला साक्षीदार आहे. सरतपासात त्याने फिर्यादीच्या कथनास अनुसरून आरोपींनी विनायक नांदीवडेकर व अंकुश गुरव यांना मारहाण केली तसेच आंबे आरोपींच्या घरी नेल्याचे सांगितले आहे. मात्र त्याच्या उलटतपासात त्याने कबूल केले आहे की, आरोपींची नावे त्याला वैयक्तिकरित्या माहिती नव्हती व ती त्याला त्याच्या मालकांकडून समजली होती. यावरून आरोपींची ओळख त्याच्या स्वतःच्या ज्ञानावर आधारित नसून फिर्यादी पक्षाकडून मिळालेल्या माहितीनुसार असल्याचे दिसते. तसेच त्याने स्पष्टपणे मान्य केले आहे की, श्रीराम गुरव त्याला पगार देतो व तो सांगेल ती कामे तो करतो. पुढे त्याने हेही कबूल केले आहे की, पोलीस स्टेशनला जाऊन जबाब देण्यासही श्रीराम गुरव यांनीच त्याला सांगितले होते. या कबुलीजबाबांमुळे साक्षीदाराचा फिर्यादी पक्षावर असलेला प्रभाव व अवलंबित्व स्पष्ट होते.

२०. विशेष म्हणजे, घटनेच्या दिवशी स्वतःहून पोलीसांकडे जाऊन जबाब नोंदवून घेण्याचा प्रयत्न त्याने केलेला नव्हता. त्यामुळे कथित गंभीर घटना प्रत्यक्ष पाहिलेल्या व्यक्तीचे

अपेक्षित नैसर्गिक वर्तन त्याच्याकडून दिसून येत नाही. त्यामुळे साक्षीदार क्र.५ याचा पुरावा हा स्वतंत्र स्वरूपाचा नसून, फिर्यादी पक्षाच्या प्रभावाखाली दिलेला असल्याची शक्यता नाकारता येत नाही. त्याची साक्ष मुख्यतः फिर्यादी व त्याचा मुलगा श्रीराम यांच्या कथनाची पुनरावृत्ती करणारी आहे. त्यामुळे त्याच्या साक्षीला स्वतंत्र पुष्टीकारक (independent corroborative) मूल्य प्राप्त होत नाही. अशा परिस्थितीत, साक्षीदार क्र.५ याच्या पुराव्यावर एकट्याने विश्वास ठेवून आरोपींची दोषसिद्धी करणे सुरक्षित ठरणार नाही.

२१. साक्षीदार क्र.६ किरण जाधव हा फिर्यादी अंकुश गुरव यांच्याकडे मजूर म्हणून काम करणारा साक्षीदार आहे. त्यामुळे तो स्वतंत्र साक्षीदार नसून फिर्यादी पक्षाशी संबंधित व हितसंबंधी स्वरूपाचा साक्षीदार आहे. सरतपासात त्याने फिर्यादीच्या कथनास अनुसरून आरोपींनी विनायक नांदीवडेकर व अंकुश गुरव यांना मारहाण केली तसेच आंबे आरोपींच्या घरी नेण्यास भाग पाडल्याचे सांगितले आहे. मात्र उलटतपासात त्याच्या साक्षीतील विश्वासार्हतेवर गंभीर परिणाम करणाऱ्या बाबी समोर आल्या आहेत. साक्षीदाराने कबूल केले आहे की, तो न्यायालयात साक्ष देण्यासाठी फिर्यादीचा मुलगा श्रीराम गुरव याच्यासोबत आला होता आणि श्रीरामच त्याला न्यायालयात घेऊन आला होता. त्याने पुढे हेही मान्य केले आहे की, साक्ष देण्यापूर्वी त्याने पोलीस जबाब वाचून पाहिला होता व त्याप्रमाणे तो न्यायालयात साक्ष देत आहे. त्यामुळे त्याची साक्ष स्वतंत्र स्मरणशक्तीवर आधारित नसून पूर्वतयारीनंतर दिलेली असल्याची शक्यता निर्माण होते. सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे, साक्षीदाराने कबूल केले आहे की, घटनेच्या दिवशी किंवा त्यानंतर स्वतःहून पोलीस स्टेशनला जाऊन आपण प्रत्यक्ष घटना पाहिली असल्याचे त्याने पोलीसांना सांगितले नव्हते. यावरून कथित प्रत्यक्षदर्शी साक्षीदार असूनही त्याचे वर्तन स्वाभाविक वाटत नाही.

२२. तसेच उलटतपासातील प्रश्नोत्तरात साक्षीदाराने मान्य केले आहे की, तो न्यायालयात जे सांगत आहे त्याबाबत त्याने पूर्वी पोलीसांना माहिती दिली होती. परंतु पुढे

त्याने हेही कबूल केले आहे की तो घटनास्थळी उपस्थित होता असे त्याच्या मालकानेच पोलीसांना सांगितले होते. ही बाब विशेष लक्षवेधी आहे. यावरून साक्षीदाराची उपस्थिती व त्याचा सहभाग हा त्याच्या स्वतःच्या पुढाकारातून नसून फिर्यादी पक्षाच्या म्हणण्यावर आधारित असल्याचा संशय निर्माण होतो. याशिवाय, मे २०२० मध्ये कोविड लॉकडाऊन लागू असताना तो स्वतःहून पोलीसांकडे गेलेला नव्हता, हे त्याने मान्य केले आहे. त्यामुळे कथित गंभीर घटनेचा प्रत्यक्ष साक्षीदार असूनही त्याने तातडीने कोणतीही माहिती पोलिसांना दिली नाही.

२३. अशा परिस्थितीत, साक्षीदार क्र.६ याची साक्ष ही पूर्णपणे स्वतंत्र व निष्पक्ष स्वरूपाची वाटत नाही. तो फिर्यादीचा मजूर असून त्याचा मालक व मालकाचा मुलगा यांच्या प्रभावाखाली असल्याचे त्याच्या स्वतःच्या कबुलीजबाबांवरून दिसून येते. त्याची साक्ष ही मुख्यतः फिर्यादी पक्षाच्या आवृत्तीची पुनरावृत्ती करणारी असून स्वतंत्र पुष्टीकरण देत नाही.

२४. साक्षीदार क्र.७ विनायक नांदीवडेकर हा या प्रकरणातील कथित जखमी साक्षीदार असून तो मूकबधिर व्यक्ती आहे. त्याचा पुरावा भारतीय साक्ष अधिनियमाच्या कलम ११९ अन्वये पात्र दुभाषाच्या माध्यमातून नोंदविण्यात आलेला आहे. न्यायालयाने दुभाषाची पात्रता तपासून त्यास सक्षम मानले असून बचाव पक्षानेही त्याबाबत कोणताही आक्षेप घेतलेला नाही. त्यामुळे केवळ साक्षीदार मूकबधिर आहे या कारणावरून त्याची साक्ष नाकारता येणार नाही. तथापि, इतर कोणत्याही साक्षीदाराप्रमाणेच त्याच्या साक्षीची विश्वासार्हता, सुसंगती व संभाव्यता यांची स्वतंत्र तपासणी करणे आवश्यक आहे. सदर साक्षीदाराने सरतपासात, आरोपींनी त्याला काठ्यांनी मारहाण केल्याचे सांगितले आहे. त्यानुसार त्याच्या उजव्या हाताला तीन टाके पडल्याचेही नमूद केले आहे.

२५. उलटतपासात त्याने कथित घटना दिनांक ११/०५/२०२० रोजी घडली असताना साक्षीदाराचा पहिला अधिकृत जबाब पोलीसांनी दिनांक १७/०७/२०२० रोजी

दुभाषाच्या उपस्थितीत नोंदविल्याचे त्याने स्पष्टपणे मान्य केले आहे. म्हणजेच घटनेनंतर तब्बल दोन महिन्यांहून अधिक कालावधीनंतर त्याचा जबाब प्रथमच विधिवत नोंदविला गेला. या विलंबाचे कोणतेही समाधानकारक स्पष्टीकरण सरकार पक्षाकडून आलेले नाही. विशेष म्हणजे, साक्षीदाराने स्वतः कबूल केले आहे की त्याला दिनांक ११/०५/२०२० रोजीच पोलीस स्टेशनला जाऊन तक्रार करण्यास कोणतीही अडचण नव्हती. त्यामुळे त्याचा जबाब नोंदविण्यात झालेला प्रदीर्घ विलंब अधिकच महत्त्वाचा ठरतो. अशा परिस्थितीत, नंतर नोंदविलेल्या निवेदनात सुधारणा, सल्लामसलत किंवा प्रभाव पडण्याची शक्यता पूर्णतः नाकारता येत नाही.

२६.　　दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे, साक्षीदाराने घटनेच्या दिवशी सकाळी ९.०० ते सायंकाळी ४.३० पर्यंत शाळेत उपस्थित असल्याचे सांगितले असले तरी त्या उपस्थितीचा कोणताही कागदोपत्री पुरावा त्याच्याकडे नसल्याचे त्याने मान्य केले आहे. त्याला शाळेकडून कोणतेही लेखी पत्र किंवा आदेश देण्यात आले नव्हते, हेही त्याने कबूल केले आहे. परिणामी, तो संपूर्ण दिवस घटनास्थळी उपस्थित होता, ही बाब केवळ त्याच्या मौखिक साक्षीवरच आधारित राहते. तसेच, सरतपासात त्याने स्वतःला खंडाळा प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचारासाठी नेल्याचे सांगितले. मात्र त्याने कबूल केले आहे की, ही बाब त्याच्या पोलीस जबाबात नमूद नाही. कथित जखमी व्यक्तीला उपचारासाठी रुग्णालयात नेण्यात आले, ही महत्त्वाची बाब असताना ती मूळ जबाबात नसणे ही एक लक्षणीय विसंगती आहे.

२७.　　याचप्रमाणे, न्यायालयात दाखविण्यात आलेल्या काठ्या त्याने ओळखल्या असल्या तरी त्याने पोलीसांना जबाब देताना त्या काठ्यांचे कोणतेही वर्णन दिले नव्हते, हे त्याने मान्य केले आहे. त्यामुळे न्यायालयातील ओळख ही स्वतंत्र व विश्वासार्ह ओळख मानण्यास अडचण निर्माण होते. विशेषतः जेव्हा इतर पंच साक्षीदारांनीही अशा प्रकारच्या काठ्या सर्वसाधारणपणे उपलब्ध असल्याचे मान्य केले आहे. पुढे, साक्षीदाराने हेही मान्य केले

आहे की, आरोपी व शाळा प्रशासन यांच्यामध्ये संबंधित आंबा कलमांबाबत पूर्वीपासून काही वाद सुरू होता का, याची त्याला माहिती नाही. त्यामुळे या घटनेमागील पार्श्वभूमीबाबत त्याचे ज्ञान मर्यादित असल्याचे दिसते.

२८. न्यायालयाच्या दृष्टीने आणखी एक महत्त्वाची बाब म्हणजे, हा साक्षीदार जखमी साक्षीदार असला तरी त्याचा पुरावा पूर्णपणे दोषरहित नाही. जखमी साक्षीदाराची साक्ष सामान्यतः महत्त्वाची मानली जाते; परंतु ती देखील परीक्षणाच्या कसोटीवर उतरली पाहिजे. सदर प्रकरणात त्याच्या साक्षीत आढळणारा विलंब, पोलीस जबाबातील त्रुटी, उपचारासंबंधी विसंगती, काठ्यांच्या ओळखीतील कमतरता आणि उपस्थितीबाबत स्वतंत्र दस्तऐवजी पुराव्याचा अभाव या बाबी दुर्लक्षित करता येणार नाहीत.

२९. त्यामुळे साक्षीदार क्र. ७ याची साक्ष पूर्णपणे नाकारण्याचे कारण नसले तरी ती स्वतंत्रपणे आणि कोणत्याही पुष्टीकरणाविना स्वीकारणे सुरक्षित ठरत नाही. त्याच्या पुराव्यास आवश्यक त्या भक्कम व स्वतंत्र पुष्टीची गरज आहे. मात्र अभिलेखावरील इतर पुरावेही संशयमुक्त व निर्विवाद स्वरूपाचे नसल्याने साक्षीदार क्र. ७ याच्या पुराव्यावर आधारित आरोपींचा दोष संशयाच्या पलीकडे सिद्ध झाला असे म्हणता येत नाही. अशा परिस्थितीत, साक्षीदार क्र.७ याचा पुरावा आरोपींविरुद्ध काही प्रमाणात संशय निर्माण करतो.

३०. साक्षीदार क्र.८ डॉ. प्रमोद सूर्यवंशी हे वैद्यकीय अधिकारी आहेत. त्यांनी स्वतः जखमी विनायक नांदीवडेकर यांची प्राथमिक तपासणी केलेली नसून त्यांचे वरिष्ठ डॉ. मिलिंद पटवर्धन यांनी केलेल्या तपासणीच्या नोंदींच्या आधारे वैद्यकीय प्रमाणपत्र सादर केले आहे. त्यामुळे त्यांचा पुरावा हा प्रत्यक्ष उपचार करणाऱ्या डॉक्टरच्या पुराव्याइतका थेट (direct) स्वरूपाचा नसून नोंदींवर आधारित दुय्यम स्वरूपाचा आहे. सरतपासात साक्षीदाराने विनायक नांदीवडेकर यांच्या शरीरावर काही जखमा व एक्स–रे मध्ये उजव्या हाताच्या चौथ्या व पाचव्या

मेटाकार्पलच्या तळाशी तसेच डाव्या बाजूच्या सातव्या बरगडीला फ्रॅक्चर आढळल्याचे नमूद केले आहे. त्याने या जखमा लाकडी काठीच्या फटक्यामुळे होऊ शकतात असे मत व्यक्त केले आहे. कथित घटना दिनांक ११/०५/२०२० रोजी घडल्याचा सरकार पक्षाचा दावा आहे, तर जखमीची वैद्यकीय तपासणी दिनांक १५/०५/२०२० रोजी म्हणजे सुमारे चार दिवसांनंतर करण्यात आली. साक्षीदाराने स्पष्टपणे मान्य केले आहे की, त्याच्या प्रमाणपत्रातील जखमा २४ तासांच्या आत झालेल्या असू शकतात. ही कबुली अत्यंत महत्त्वाची आहे. कारण जर जखमा खरोखरच दिनांक ११/०५/२०२० रोजी झाल्या असत्या, तर दिनांक १५/०५/२०२० रोजी तपासणीवेळी त्या सुमारे चार दिवस जुन्या असणे अपेक्षित होते. मात्र डॉक्टरच्या स्वतःच्या म्हणण्यानुसार, त्या २४ तासांच्या आत झालेल्या असू शकतात.

३१.	पुढे साक्षीदाराने असे कबूल केले आहे की, जर प्रमाणपत्रातील फ्रॅक्चरच्या जखमा दिनांक ११/०५/२०२० रोजी झाल्या असत्या तर रुग्णाची प्रकृती स्थिर राहिली नसती व त्याला तत्काळ वैद्यकीय उपचारांची आवश्यकता भासली असती. मात्र अभिलेखावरून दिसून येते की, कथित जखमीने तत्काळ वैद्यकीय उपचार घेतल्याचा कोणताही विश्वासार्ह पुरावा सरकार पक्षाने सादर केलेला नाही.

३२.	त्यानंतर, साक्षीदाराने हेही मान्य केले आहे की, रुग्णाने पूर्वी काही उपचार घेतले होते का याचा कोणताही उल्लेख वैद्यकीय प्रमाणपत्रात नाही. त्यामुळे दिनांक १५/०५/२०२० रोजी आढळलेल्या जखमा नेमक्या कोणत्या घटनेतून निर्माण झाल्या याबाबत निश्चित निष्कर्ष काढणे शक्य होत नाही.

३३.	भारतीय दंड विधान कलम ३२६ लागू होण्यासाठी आरोपीने धोकादायक हत्यार अथवा साधन वापरून गंभीर दुखापत (grievous hurt) केल्याचे संशयाच्या पलीकडे सिद्ध होणे आवश्यक आहे. सदर प्रकरणात फ्रॅक्चर झाल्याचा वैद्यकीय उल्लेख असला

तरी त्या फ्रॅक्चरचा संबंध थेट दिनांक ११/०५/२०२० च्या कथित घटनेशी जोडणारा निर्विवाद पुरावा उपलब्ध नाही. जखमीची तपासणी चार दिवसांनी झाली आहे. डॉक्टरच्या मते जखमा २४ तासांच्या आत झालेल्या असू शकतात. जखमांचा कालावधी (age of injuries) व घटनेची तारीख यामध्ये विसंगती दिसून येते. उपचाराच्या सातत्याचा (continuity of treatment) पुरावा नाही. त्यामुळे वैद्यकीय पुराव्यावरून फ्रॅक्चर झाले हे जरी गृहीत धरले तरी ते आरोपींच्या कथित मारहाणीमुळेच झाले, ही बाब संशयाच्या पलीकडे सिद्ध होत नाही.

३४. भारतीय दंड विधान कलम ३२४ मध्ये धोकादायक साधनाने दुखापत केल्याचा प्रश्न येतो. या प्रकरणात कथित हत्यार म्हणून लाकडी काठ्यांचा उल्लेख आहे. मात्र जप्त काठ्यांचे कोणतेही विशिष्ट वर्णन डॉक्टरांना देण्यात आलेले नव्हते. काठ्यांवर रक्ताचे डाग, फॉरेन्सिक तपासणी किंवा इतर वैज्ञानिक पुरावा उपलब्ध नाही. डॉक्टरांनी केवळ "अशा जखमा काठीच्या फटक्याने होऊ शकतात" एवढेच मत व्यक्त केले आहे. "होऊ शकतात" (could be caused) हा निष्कर्ष निश्चित (conclusive) स्वरूपाचा नसून संभाव्यतेवर आधारित आहे. म्हणून वैद्यकीय पुरावा आरोपींच्या विरोधातील प्रत्यक्ष पुराव्याला पुष्टी देणारा असला तरी तो स्वतःहून आरोपींचा सहभाग सिद्ध करीत नाही. साक्षीदार क्र.८ यांचा पुरावा केवळ इतकेच दर्शवितो की, विनायक नांदीवडेकर यांना काही शारीरिक दुखापती व फ्रॅक्चर आढळले होते. मात्र जखमांची तपासणी कथित घटनेनंतर चार दिवसांनी झाली आहे. डॉक्टरांनी जखमा २४ तासांच्या आत झालेल्या असू शकतात असे मान्य केले आहे. जखमा व कथित घटना यांचा कालानुक्रमिक संबंध संशयमुक्तपणे सिद्ध झालेला नाही. पूर्वीच्या उपचारांचा किंवा जखमांच्या सातत्याचा पुरावा उपलब्ध नाही. डॉक्टरांनी आरोपींमुळेच या जखमा झाल्या असे कोणतेही निश्चित मत दिलेले नाही. वैद्यकीय पुरावा हा केवळ सहाय्यक (corroborative) स्वरूपाचा असून आरोपींचा सहभाग स्वतंत्रपणे सिद्ध करीत नाही. त्यामुळे वैद्यकीय पुराव्यावरून जखमा झाल्या असतील असे मानता येते; परंतु त्या जखमा

आरोपींनीच दिनांक ११/०५/२०२० रोजी केलेल्या कथित मारहाणीमुळे झाल्या, ही बाब संशयाच्या पलीकडे सिद्ध होत नाही. परिणामी, साक्षीदार क्र.८ याचा पुरावा कलम ३२४ किंवा ३२६ अंतर्गत आरोपींची दोषसिद्धी करण्यासाठी स्वतंत्रपणे पुरेसा ठरत नाही आणि त्यातून निर्माण होणारा संशय आरोपींच्या फायद्यास जातो.

३५. साक्षीदार क्र.९ तपासी अधिकारी–अस्मिता पाटील यांनी गुन्ह्याचा तपास केल्याबाबत साक्ष दिली आहे. त्यांच्या पुराव्यातून जप्ती पंचनामा, घटनास्थळ पंचनामा, छायाचित्रे, वैद्यकीय कागदपत्रे व मुकबधिर साक्षीदाराचा जबाब नोंदविण्याची प्रक्रिया याबाबत माहिती समोर येते. तथापि, उलटतपासात तपासातील काही महत्त्वपूर्ण त्रुटी व अपूर्णता स्पष्ट झालेली आहे. घटना सायंकाळी ५.१५ वाजता घडल्याचा आरोप असताना आणि फिर्याद रात्री १०.०६ वाजता नोंदविली गेली असताना, त्या दरम्यान फिर्यादी व इतर साक्षीदार कोठे होते व त्यांनी काय केले याचा कोणताही तपास अधिकाऱ्यांनी केलेला नाही. ही बाब महत्त्वाची असून फिर्याद दाखल होण्यापूर्वी सल्लामसलत अथवा विचारविनिमय झाला होता का याचा शोध तपासात घेतलेला नाही. तपासी अधिकाऱ्यांनी स्वतः मान्य केले आहे की, घटनास्थळाची जागा शैक्षणिक संस्थेच्या मालकीची असल्याचा कोणताही पुरावा त्यांना मिळालेला नाही. त्यांनी घटनास्थळाच्या जमिनीचा सातबारा किंवा मालकीसंबंधीची कागदपत्रे तपासात मिळवून घेतलेली नाहीत. परिणामी, कथित आंबा बागेवर प्रत्यक्ष ताबा अथवा मालकी कोणाची होती, हा वादग्रस्त मुद्दा तपासादरम्यान स्पष्ट करण्यात आलेला नाही. शिवाय आरोपींची अशी भूमिका होती की, संबंधित आंबा बागेतून आंब्यांची चोरी होत होती. अशा प्रकारची कोणती ऑनलाईन तक्रार आरोपींनी पूर्वी केली होती का याबाबत तपासी अधिकाऱ्यांनी कोणतीही चौकशी केलेली नाही. त्यामुळे बचाव पक्षाने मांडलेली शक्यताही तपासात पडताळण्यात आलेली नाही. याशिवाय, फिर्यादीचा मुलगा श्रीराम गुरव याच्या ताब्यात दांडा असल्याचा मुद्दा पुराव्यात आलेला असतानाही तो दांडा जप्त करण्यात आलेला नाही. त्यामुळे कथित गुन्ह्यात वापरलेल्या हत्यारांच्या जप्तीबाबत संपूर्णता व निष्पक्षता दिसून येत नाही. वैद्यकीय पुराव्याच्या बाबतीतही,

कथित घटना दिनांक ११/०५/२०२० रोजी घडल्याचा दावा असताना जखमीचा उपलब्ध वैद्यकीय दाखला दिनांक १५/०५/२०२० रोजीचा आहे. त्या कालावधीत उपचार झाले होते का याबाबत तपासी अधिकारी निश्चित माहिती देऊ शकल्या नाहीत.

३६. अशा परिस्थितीत साक्षीदार क्र.९ यांचा पुरावा केवळ तपासाच्या औपचारिक बाबी सिद्ध करतो. मात्र त्यांच्या उलटतपासातून तपासातील महत्त्वाच्या त्रुटी, अपूर्ण चौकशी व काही मूलभूत बाबींची पडताळणी न झाल्याचे दिसून येते. त्यामुळे तपासी अधिकाऱ्यांचा पुरावा आरोपींविरुद्धचा गुन्हा संशयाच्या पलीकडे सिद्ध करण्यास स्वतंत्रपणे पुरेसा ठरत नाही. उलट, तपासातील या त्रुटींमुळे सरकार पक्षाच्या प्रकरणाबाबत वाजवी संशय निर्माण होतो, ज्याचा लाभ आरोपींना देणे आवश्यक ठरते.

३७. एकूण पुराव्याचे मूल्यांकन करता पुढील बाबी स्पष्ट होतात, फिर्यादी व आरोपी यांच्यात घटनेपूर्वीपासून आंबा बागेबाबत वाद अस्तित्वात होता. आरोपींनी पूर्वी फिर्यादीविरुद्ध आंबे चोरीबाबत तक्रार दिलेली होती. सन २०२० मध्ये बागेचा कोणताही लेखी करार नसल्याचे फिर्यादीने मान्य केले आहे. बागेच्या मालकीबाबत फिर्यादी स्वतः निश्चित माहिती देऊ शकत नाही. कथित मारहाणीस भक्कम स्वतंत्र पुष्टीकरण उपलब्ध नाही. कथित हत्याराचा आरोपींशी संबंध सिद्ध होत नाही. फिर्यादीची घटना सांगण्याची पद्धत अनेक बाबतीत अप्राकृतिक व संभाव्यतेविरुद्ध वाटते.

३८. फिर्यादीला आरोपींविरुद्ध खोटा गुन्हा दाखल करण्याचे कारण (motive for false implication) उपलब्ध होते. त्यामुळे साक्षीदार क्र.१ याचा पुरावा पूर्णपणे विश्वासार्ह, निष्पक्ष व दोषसिद्धीसाठी पुरेसा वाटत नाही. त्याच्या साक्षीतून निर्माण होणारा संशय दूर होत नसल्याने आरोपींना संशयाचा फायदा (benefit of doubt) देणे आवश्यक ठरते. आरोपींविरुद्धचा आरोप संशयाच्या पलीकडे सिद्ध करण्यात सरकार पक्ष अपयशी ठरला आहे.

३९.　　फौजदारी खटल्यात आरोपीचा दोष संशयाच्या पलीकडे (Beyond Reasonable Doubt) सिद्ध करणे ही सरकार पक्षाची जबाबदारी असते. आरोपीने आपले निरपराधित्व सिद्ध करण्याची आवश्यकता नसते. अभिलेखावरील संपूर्ण पुरावा तपासल्यानंतर असे दिसून येते की सरकार पक्षाची कथा अनेक गंभीर विसंगती, त्रुटी, अपूर्ण तपास व अविश्वसनीय साक्षींनी ग्रस्त आहे.

४०.　　भारतीय दंड विधान कलम ३२६ सिद्ध होत नाही. कलम ३२६ साठी आवश्यक, गंभीर दुखापत, आरोपीकडूनच झालेली, धोकादायक साधनाने सिद्ध करणे आवश्यक आहे. या प्रकरणात फ्रॅक्चर असल्याचे प्रमाणपत्र आहे. पण फ्रॅक्चरचा घटनेशी संबंध सिद्ध नाही. जखमांचे वय सिद्ध नाही. उपचारांचा सातत्यपूर्ण पुरावा नाही. म्हणून आरोपींनीच गंभीर दुखापत केली हे सिद्ध होत नाही. त्यामुळे कलम ३२६ अपयशी ठरते.

४१.　　तसेच, भारतीय दंड विधान कलम ३२४ ही सिद्ध होत नाही. कथित हत्यार म्हणजे दोन काठ्या. मात्र काठ्यांवर रक्ताचे डाग नाहीत. FSL अहवाल नाही. स्वतंत्र ओळख नाही. साक्षीदार क्र. १ ने सांगितलेला दांडा त्याच्या मुलाने काढून घेतला होता, पण तो जप्तच करण्यात आलेला नाही. साक्षीदार क्र. ९ ने ते मान्य केले आहे. त्यामुळे जप्त काठ्या आणि कथित मारहाण यातील संबंध सिद्ध झालेला नाही.

४२.　　भारतीय दंड विधान कलम ३४१ अयोग्य प्रतिबंध (Wrongful Restraint) साठी आरोपींनी फिर्यादीचा मार्ग अडविला हे स्पष्टपणे सिद्ध होणे आवश्यक आहे. सदर प्रकरणात फिर्यादी स्वतः सांगतो की, आरोपी त्यांना त्यांच्या घरी घेऊन गेले. ते स्वतः वाहन चालवत आरोपींच्या घरी गेले. नंतर परत आले. कोणतीही कैद अथवा अटकावाची स्वतंत्र घटना सिद्ध नाही म्हणून कलम ३४१ चे घटक सिद्ध होत नाहीत. भारतीय दंड विधान कलम ५०४ करीता जाणूनबुजून अपमान, भडकावण्याचा हेतू, शांतता भंग होण्याची शक्यता,

सिद्ध करणे आवश्यक आहे. फिर्यादीने आरोपींनी शिवीगाळ केली असे सर्वसाधारण म्हटले आहे. मात्र कोणती शिवी दिली ते नमूद नाही. नेमके शब्द नाहीत. कोणत्या आरोपीने काय म्हटले ते नाही. त्यामुळे कलम ५०४ चे आवश्यक घटक सिद्ध होत नाहीत. भारतीय दंड विधान कलम ५०६ साठी नेमकी धमकी, त्यातून निर्माण झालेली भीती, धमकीचा परिणाम, सिद्ध होणे आवश्यक आहे. येथे केवळ "मारून टाकतो", "बागेत येऊ नका" अशा स्वरूपाची विधाने आहेत. त्यामुळे कलम ५०६ चे घटक पूर्ण होत नाहीत.

४३. तपासी अधिकाऱ्यांनी कबूल केले की, घटनेपासून FIR पर्यंतचा कालावधी तपासला नाही. जागेची मालकी तपासली नाही. आरोपींच्या तक्रारीची चौकशी केली नाही. श्रीरामकडील दांडा जप्त केला नाही. जखमांच्या तारखेबाबत स्वतंत्र पडताळणी केली नाही. अभिलेखावरील संपूर्ण पुराव्याचे एकत्रित मूल्यांकन करता, घटनेची पार्श्वभूमी वादग्रस्त आहे. आंबा बागेवरील हक्क सिद्ध नाही. स्वतंत्र निष्पक्ष साक्षीदार नाही. मूकबधीर जखमी साक्षीदाराचा जबाब विलंबाने नोंदविण्यात आला. वैद्यकीय पुरावा व मौखिक पुरावा परस्पर विसंगत आहेत. जप्त हत्यारांचा गुन्ह्याशी संबंध सिद्ध झालेला नाही. तपासात गंभीर त्रुटी आहेत. त्यामुळे सरकार पक्ष आरोपींनी भारतीय दंड विधान कलम ३२६, ३२४, ३४१, ५०४, ५०६ सह ३४ अन्वये गुन्हा केला आहे हे संशयाच्या पलीकडे सिद्ध करण्यात पूर्णतः अपयशी ठरलेला आहे. त्यामुळे, उपरोक्त विवेचनावरुन, मी प्रश्न क्रमांक १ ते ५ यांचे उत्तर नकारार्थी देते.

**<u>प्रश्न क्रमांक ६ बाबत</u> : –**

४४. आरोपींचे विरुद्धचा दोषारोप संशयापलीकडे शाबित करण्याइतपत सबळ पुरावा अभियोग पक्षाने न्यायालयासमोर आणलेला नाही. या कारणास्तव, आरोपींना भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ३२६, ३२४, ३४१, ५०४, ५०६ सह ३४ अन्वये दंडनीय अपराधातून निर्दोष मुक्त करणे क्रमप्राप्त आहे. वर नमूद कारणास्तव, प्रश्न क्रमांक ६ च्या अनुषंगाने, मी खालील आदेश पारीत करीत आहे –

## आदेश

१. आरोपी क्रमांक १ व २ यांची फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) प्रमाणे भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ३२६, ३२४, ३४१, ५०४, ५०६ सह ३४ अन्वये शिक्षेस पात्र असलेल्या गुन्ह्यांच्या आरोपातून, निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपींचा जामीन व बंधपत्र रद्द करण्यात येतात. त्यांना मुक्त करण्यात येते.

३. अपिलाचा कालावधी संपल्यानंतर, जप्त मुद्देमाल म्हणजेच लाकडी दांडके हे मूल्यहीन असल्याने ते नाश करण्यात यावे, तर काळ्या पिवळ्या रंगाची ऑटो रिक्षा क्र.एम.एच.०८/ई/५१२७ ही या पूर्वीच फौजदारी किरकोळ अर्ज नं.३६६/२०२० मधील दिनांक १०/०७/२०२० रोजीच्या आदेशाने आरोपी–सुनाथ पंढरीनाथ बोरकर व हिरो होंडा कंपनीची स्प्लेंडर मोटर सायकल क्र.एम.एच.०८/टी/६६६५ ही या पूर्वीच फौजदारी किरकोळ अर्ज नं. ३६७/२०२० मधील दिनांक २१/०७/२०२० रोजीच्या आदेशाने विनायक वासुदेव कळंबटे यांच्या ताब्यात देण्यात आलेली आहे, या दोन्ही वाहनांचा ताबा त्यांच्याकडेच कायम करण्यात यावा.

४. आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ४३७–अ अन्वये जामीन कदब्याची पूर्तता करावी.

५. या न्यायनिर्णयाची माहिती ना. उच्च न्यायालय, मुंबई यांच्याकडील फौजदारी अपिल एस.टी.क्र.३९०/२०१९ च्या न्यायनिर्णयातील निर्देशानुसार जिल्हादंडाधिकारी, रत्नागिरी यांना कळवण्यात यावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by SUNAYANA SACHINKUMAR PINGALE
Date: 2026.06.13 17:32:40 +0530

ठिकाण – रत्नागिरी.  (श्रीम. एस.एस.पिंगळे)

दिनांक – १३/०६/२०२६  मुख्य न्यायदंडाधिकारी, रत्नागिरी.

-:C E R T I F I C A T E:-

I affirm that the contents of this Pdf file Judgment are same word as per original Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | S.M.Jadhav,Grade II |
| Court Name | :- | The Court of Chief Judicial Magistrate, Ratnagiri |
| Date of decision | :- | 13.06.2026 |
| Judgment signed by P.O. on | :- | 13.06.2026 |
| Judgment uploaded on | :- | 13.06.2026 |